-:: कार्यालय ::-
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका गोंदिया यांचे कार्यालय
लिल्हारे बिल्डींग, वसंत नगर, बालाघाट रोड, गोंदिया जिल्हा गोंदिया
Email ID :- arcs_gnd@rediffmail.com दुरध्वनी क्र.07182-253177

क्रंसनिगों/नियमन/कलम77/आदेश/ 3360 /2017 दिनांक :- 30/08/96

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77(अ)(1)(ड) (2) व सहवाचन नियम 63 (अ) अतंर्गत आदेश

**वाचा :-या कार्यालयाचे नोटीस क्रमांक सनिगो/नियमन/कलम77/2855/17 दिनांक 11.7.17**

ज्याअर्थी, **जनसेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या. मुरदाडा र.नं.741** तालुका गोंदिया जिल्हा गोंदिया ही संस्था (जीचा या पुढे केवळ सहकारी संस्था म्हणुन उल्लेख केलेला आहे.) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961 अंतर्गत नोदणीकृत सहकारी संस्था असुन सदर संस्थेला कायदा,नियम व पोटनियमातील तरतुदीनुसार कामकाज करणे बंधनकारक आहे व सदर संस्था ही या कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम 2014 मधील तरतुदीनुसार **जनसेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या. मुरदाडा र.नं.**741 या संस्थेची निवडणुक घेण्यात आली असून निवडून आलेल्या नवनिर्वाचित समिती सदस्यांची प्रथम सभा दिनांक 22.2.2017 रोजी घेण्यात आली व नवनिर्वाचित सदस्यांमधून पदाधिकाऱ्याची निवड करण्यात आलेली आहे.आणि,

ज्याअर्थी, ज्याअर्थी, **जनसेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या. मुरदाडा र.नं.**741 या संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष यांनी संस्थेचे कागदपत्रे व मालमत्तेचा चार्ज न मिळाल्याबाबत या कार्यालयात दिनांक 27.3.2017 रोजी तक्रार उपस्थित केली होती आणि सदर तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. सनिगो/नियमन/तक्रार/खुलासा/ 1803/2017 दिनांक 5.4.2017 च्या पत्रान्वये संस्थेचे माजी प्राधिकृत अधिकारी व संस्थेचे व्यवस्थापक यांचेकडून खुलासा मागविण्यात आला असून सदर खुलासा विचारात घेता मान्य करण्यात आलेला आहे.आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे माजी प्राधिकृत अधिकारी व संस्थेचे व्यवस्थापक यांनी त्यांचे दिनांक 10.4.2017 व 7.4.2017 च्या पत्रानुसार सादर केलेला खुलासा विचारात घेता संस्थेचे संपूर्ण रेकॉर्ड संस्था दप्तरी उपलब्ध असल्याचे या कार्यालयाचे निदर्शनास आल्यावरुन या कार्यालयाचे पत्र क्र.सनिगो/नियमन/तक्रार/1870/2017 दिनांक 21.4.2017 च्या पत्रान्वये संस्थेचे अध्यक्ष यांस संस्थेचे पुढील कामकाज पाहण्यास्तव कळविण्यात आले होते तसेच प्रकरणी संस्थेचा संपूर्ण रेकॉर्डचा ताबा घेण्यास इच्छुक असल्यास त्यानुसार व्यवस्थापकाकडून प्राप्त करुन घेवून संस्थेचे पुढील कामकाज पाहण्यास्तव निर्देशित करण्यात आले होते. आणि,

ज्याअर्थी, उक्त पत्राचे अनुषंगाने **जनसेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या. मुरदाडा र.नं.**741 या संस्थेच्या व्यवस्थापकानी त्यांचे दिनांक 9.6.2017 च्या पत्रान्वये या कार्यालयाने दिलेल्या निर्देशानुसार संस्थेचे संपूर्ण रेकॉर्ड संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध असून पदभार ग्रहन करुन संस्थेचे व्यवहार सुरळीत चालविण्याकरीता संस्थेचे अध्यक्ष यांस कळविले होते. आणि,

ज्याअर्थी, नवनिर्वाचित संचालकांनी संस्थेचे चार्ज न स्विकारल्याबाबत संस्थेचे सभासद श्री. प्रमोद सुखदेव बाकरे, राहणार मुरदाडा यांनी दिनांक 29.5.2017 व 12.6.2017 च्या पत्रान्वये तक्रार या कार्यालयाकडे उपस्थित केलेली होती.आणि,

ज्याअर्थी, श्री. प्रमोद सुखदेव बाकरे, राहणार मुरदाडा यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र.सनगो/विकास2/पत संस्था/तक्रार/2527/17 दिनांक 19.6.2017 नुसार दिनांक 28.6.2017 रोजी ठिक 4.00 वाजता या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने सुनावणीकरीता अर्जदार श्री. प्रमोद सुखदेव बाकरे, राहणार मुरदाडा, संस्थेचे व्यवस्थापक श्री.मुकेश लिल्हारे हे हजर होते आणि संस्थेच्या अध्यक्षाच्या वतीने संस्थचे उपाध्यक्ष श्री.रामचंद्र सुलाखे व संचालक श्री.विजय लिल्हारे उपस्थित झालेत. तसेच प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष हे अनुपस्थित होते व त्यांनी दिनांक 27.6.2017 च्या पत्रान्वये अर्जदार श्री.प्रमोद सुखेदव बाकरे यांच्या पत्राचा खुलासा करण्याची गरज भासत नाही असे या कार्यालयास लेखी कळविले होते. आणि,

ज्याअर्थी, सदर सुनावणीवेळी संस्थेचे व्यवस्थापक श्री. मुकेश लिल्हारे यांनी संस्थेचा संपूर्ण रेकॉर्ड यादीसह व आर्थिक पत्रकासह दिनांक 3.7.2017 रोजी संचालक मंडळास सुपूर्त करण्याचे मान्य केले. तसेच अर्जदार श्री.प्रमोद सुखदेव बाकरे यांनी दिनांक 28.6.2017 च्या पत्रान्वये नवनिर्वाचित संचालक मंडळ संस्थेचा पदभार ग्रहण करण्यात 90 दिवसापेक्षा अधीक कालावधी लोटलेला असूनही आपली जबाबदारी स्विकारण्यास असमर्थ व बेजबाबदार ठरलेले आहेत. त्यामुळे निकामी संचालक मंडळास बरखास्त करुन नवीन निवडणुक घेण्यात यावी किंवा समिती स्थापन करुन वसुलीची कार्यवाही करण्यात यावी अशी या कार्यालयास विनंती केली होती. आणि,

आणि, ज्याअर्थी, वरील विवेचनानुसार संस्थेचे अध्यक्ष श्री.तुकाराम एस. पराते यांनी दिनांक 3.7.2017 च्या पत्रान्वये कळविल्यानुसार दिनांक 3.7.2017 रोजी संस्थेचे कार्यालयात गेले असता संस्थेचे रेकॉड अपूर्ण असल्याने चार्ज प्राप्त झाला नसल्याचे कळविले आहे तसेच प्रस्तुत प्रकरणी संस्थेचे व्यवस्थापक यांनी दिनांक 4.7.2017 रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, दिनांक 3.7.2017 ला 11.00 वाजता संस्थेचे संचालक कार्यालयात आले असता काही रेकॉर्डची पाहणी करुन रेकॉर्ड अपूर्ण आहे, सन 2014-15 ची व्याजाची आकारणी केलेली नाही, नफातोटा पत्रक, जमाखर्च व ताळेबंद पत्रक हे प्रशासक किंवा प्रमाणित लेखापरिक्षक यांच्याकडून प्रमाणित केलेले असावे, कर्ज प्रकरणे अपूर्ण भरलेले आहे असे कारण दाखवून निघून गेलेत. त्यामुळे संचालक मंडळ पदभार ग्रहण करण्यास इच्छुक नाही व टाळाटाळ करीत आहेत.

एकंदरीत वरील विववेचन व वस्तुस्थितीवरुन असे दिसून येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम 2014 च्या तरतुदीनुसार नवनिर्वाचित सदस्यांनी प्रथम सभेच्या (म्हणजेच) दिनांक 22.2.2017 च्या तारखेपासून ते आजपावेतो पदभार स्विकारलेला नसून संस्थेचे कामकाज करण्यास जाणीवपूर्वक हेतूपुरस्परपणे टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास येते. यावरुन उक्त परिस्थिती विचारात घेता नवनिर्वाचित सदस्य संस्थेचे कामकाज करण्यास इच्छुक नाहीत असेही स्पष्ट होते.आणि,

ज्याअर्थी, वर नमुद परिस्थिती, सभासदाचे हित व ठेवीदारांच्या ठेवी विचारात घेता सदर संस्थेवर यापुढे संचालक मंडळ कार्यरत ठेवणे सभासदांच्या व ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीने व्यवहार्य ठरणार नाही. त्यामुळे उक्त संस्थेवर कलम 77 अ (ब) (दोन) मधील तरतुदीनुसार नवीन समिती पदग्रहन करेपर्यंत उक्त संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी प्रभावीपणे प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे अनिवार्य झाले असल्याबाबत माझे स्पष्ट मत झाले आहे म्हणुन वर नमुद परिस्थिती विचारात घेता **जनसेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या.मुरदाडा र.नं.**741 या संस्थेच्या सर्व विद्यमान समिती

सदस्यांना या कार्यालयाचे उपरोक्त वाचानुसार नोटीस देण्यात येवून त्यांचे म्हणणे 15 दिवसांचे आंत सादर करण्यास्तव कळविण्यात आले होते.आणि सदर नोटीसच्या अनुषंगाने दिनांक 26.7.2017 रोजी या कार्यालयास ठिक दुपारी 4.00 वाजता सुनावणी ठवण्यात आली होती.आणि,

ज्याअर्थी सदर नोटीसीच्या अनुषंगाने संस्थेचे सर्व विद्यमान समिती सदस्य दिनांक 26.7.2017 रोजीच्या सुनावणीस उपस्थित झालेत. सदर सुनावणी वेळी त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे या कार्यालयास सादर केलेले आहे.आणि,

ज्याअर्थी, विद्यमान समिती सदस्यांनी दिनांक 26.7.2017 च्या पत्रान्वये सादर केलेला खुलासा विचारात घेता उपरोक्त नमुद परिस्थिती कायम असून या कार्यालयाचे दिनांक 21.3.2017 नुसार कळविलेली वस्तुस्थिती देखील कायम असल्याचे माझे स्पष्ट निदर्शनास आले आहे.आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे व्यवस्थापन समिती सदस्य संस्थेचे कामकाज चालविण्यास जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन आपली जबाबदारी पार पाडण्यास सातत्याने कसूर करीत असल्याचे माझे स्पष्ट मत झालेले आहे. त्यामुळे सदर समिती संस्थेवर कार्यरत ठेवणे सभासदांचे हिताचे दृष्टीने पोषक ठरत नाही अशी माझी खात्री झालेली आहे. त्याअर्थी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-// आदेश //-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77-अ (1)(ड) (2) व सहवाचन नियम 63(अ) मधील तरतुद व महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रं.सीएसएल/1493/ सीआर-47/15-सी, दिनांक 7 ऑगष्ट 1993 नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, **डी.ए. घोडेचोर,** सहाय्यक निंबंधक, सहकारी संस्था, तालुका गोंदिया याद्वारे **जनसेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या.मुरदाडा र.नं.**741 या संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ बरखास्त करुन त्याऐवजी **श्री. एस. के.भारती, सहकारी अधिकारी श्रेणी-1** अधीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका गोंदिया यांची मुख्य प्राधीकृत अधिकारी तसेच मुख्य प्राधिकृत अधिकारी यांस सहकार्य करण्याकरीता **श्री. ए.डी. रामटेके, लेखापरिक्षक श्रेणी-2** अधीन जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-1, सहकारी संस्था, गोंदिया यांची सहाय्यक प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

सदरहू आदेश आज दिनांक 24.8.2017 रोजी माझे सही व शिक्क्यानिशी पारित केला आहे.

**(डी.ए.घोडेचोर)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था,तालुका गोंदिया**

प्रति,

१. श्री./श्रीमती ____________________
अध्यक्ष/उपाध्यक्ष/सचिव/संचालक, **जनसेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या.मुरदाडा र.नं.**741 यांना माहितीस्तव रवाना.

२. व्यवस्थापक/सचिव, **जनसेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या.मुरदाडा र.नं.**741 यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव रवाना. त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर आदेश संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावा व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. **श्री. एस. के. भारती, सहकारी अधिकारी श्रेणी**-1 अंतर्गत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तालुका,गोंदिया यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरीता रवाना. त्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी सदरहु संस्थेच्या प्राधिकृत अधिकारी पदाचा पदभार तात्काळ स्विकारुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

४. **श्री. ए.डी. रामटेके, लेखापरिक्षक श्रेणी**-2 अधीन जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-1, सहकारी संस्था, गोंदिया यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरीता रवाना. त्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी सदरहु संस्थेच्या सहाय्यक प्राधिकृत अधिकारी पदाचा पदभार तात्काळ स्विकारुन या कार्यालयाचे पुढील आदेशापावेतो कामकाज पहावे व संस्थेच्या प्रशासकीय कामकाजात संस्थेचे मुख्य प्रशासक यांस सहकार्य करावे व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

५. मा.सरव्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.गोंदिया यांना माहितीस्तव सादर.

६. शाखा व्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.गोंदिया शाखा **गोंदिया/मुख्यालय गोंदिया** यांना माहितीस्तव रवाना.

७. अर्जदार श्री. प्रमोद सुखदेव बाकरे, राहणार मुरदाडा यांना माहितीकरीता रवाना.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर** :- मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गोंदिया

**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था,तालुका गोंदिया**

F:\77-1-B Banather